# माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. १७/०४/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मा. संचालकसो, विद्याप्राधिकरण पुणे, यांचे पत्र दि. ०५/१०/२०१७ च्य इ. १ ली ते इ. १० वी करीता विषयनिहाय तासिका विभागणी बाबत. | संघटनेने याबाबत स्वतंत्र निवेदन द्यावे. कार्यालयामार्फत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यात येईल.<br>शिक्षणाधिकारी यांनी एम.सी.सी. व स्वसंरक्षणशास्त्र विषय मान्यतेचे कॅम्प लावावे. | शिक्षणाधिकारी/ संस्टनास्तरावर | -- |
| २ | कोल्हापूर विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा भ.नि.नि. स्लीप वितरणाबाबत. | वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूणे करुन माहे-जून २०१८ अखेर पर्यंत स्लिपांचे वितरण पूर्ण करावे. शिक्षणाधिकारी यांनी याबाबत वेतन पथकास सूचना द्याव्यात. | शिक्षणाधिकारी/ वेतन पथक स्तरावर | माहे-जून २०१८ |
| ३ | शिक्षक व शिक्षकेतर भरती वरील बंदी उठवण्याचे शासनाचे धोरण काय आहे? | शिक्षक-शिक्षकेतर भरतीवरील बंदी उठवणे ही शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे.<br>वैयक्तिक मान्यता प्रकरणांबाबत शिक्षणाधिकारी यांनी एम.ई.पी.एस., ॲक्ट १९७७ ची नियमावली व शासन निर्णय दि. ६.०२.२०१२ मधील तरतूदीनुसार भारती बंदीस बाधा न येता प्रलंबित प्रस्तावांवर निर्णय घ्यावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४ | अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाची प्रक्रिया तसेच सद्याची वस्तूस्थिती काय आहे? | सांगली, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील समायोजन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात एकुण १२९ अतिरिक्त शिक्षकांपैकी ९६ जणांचे समायोजन करण्यात आले. ९६ पैकी ४७ शिक्षक हजर झालेले आहेत. रुजू न करुन घेतलेल्या ४९ पदे व्यवगत करण्याची करवाई सुरु कण्यात आलेली आहे. या ४९ पदांपैकी ३१ शिक्षकांनी न्यायालयात समायोजनाबाबत याचिका दाखल केलेल्या आहेत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ५ | आपल्या अधिनस्त कार्यालयाकडे येणाऱ्या प्रस्तावाची निर्गत करण्याची पध्दत काय आहे. व | सर्व शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात प्राप्त होणाऱ्या प्रकरणे उदा. वरीष्ठ व निवड श्रेणी मंजूरी प्रस्ताव, वैद्यकीय | शिक्षणाधिकरी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रलंबित राहण्याचे कारणे काय आहे.? | प्रतिपूर्ती प्रस्ताव, भविष्य निर्वाह निधी विषयक कर्ज मागणी प्रस्ताव इ. बाबत प्रकरण कार्यालयात दाखल होताच १५ दिवसांत कार्यवाही पूर्ण करावी. | | |
| ६ | शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान व त्याची सद्यस्थिती. | वेतनेतर अनुदानाबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून शाळांना देण्यात येणारे आरटीई प्रमाणपत्र हे तीन वर्षासाठी ग्राह्य धरले जाते. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दरवर्षी वेतनेतर अनुदानासाठी आरटीई प्रमाणपत्राची मागणी करु नये. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सूचना देण्यात याव्यात. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) स्तरावर | -- |
| ७ | विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सर्व लाभाच्या योजना व त्याची कार्यवाही. | ऑनलाईन शिष्यवृत्तीबाबत पात्र विद्यार्थ्यांना मिळणारी रक्कम ही संचालनयामार्फत परस्पर विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात येते. | -- | -- |
| ८ | संच मान्यतेतील त्रुटी बाबत व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या संचमान्यतेबाबत काय परिस्थिती आहे? | सर्व शिक्षणाधिकारी यांनी संच मान्यता त्रुटी प्रस्तावांवर तात्काळ निर्णय घेवून प्रस्तावांची निर्गती करावी.<br>ऑनलाईन संच मान्यतेबाबतची कार्यवाही एनआयसी, पुणे यांचेकडून करणेत येते. २०१७-१८ संच मान्यतेबाबत वरिष्ठ स्तरावरुन अद्याप याबाबत कोणत्याही सूचना प्राप्त नाहीत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ९ | अनुदानित शाळांतील विनाअनुदानित तुकडया व कनिष्ठ महाविद्यालयामधील विनाअनुदानित तुकडयाबाबत शासनाचे काय धोरण आहे? | धोरणात्मक बाब आहे. | शासन स्तरावर | -- |
| १० | शालार्थ वेतनप्रणाली सद्यस्थिती व नवीन नावे समाविष्ट करणेसाठीची स्थिती. | सद्यस्थितीत शालार्थ प्रणाली तांत्रिक अडचणीमुळे बंद आहे. ऑफलाईन वेतन काढण्याची शासन आदेश आहेत. शालार्थ प्रणालीत नवीन कर्मचाऱ्यांना शालार्थ क्रमांक देण्यासाठी मा. आयुक्त शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली विशेष कृती दल स्थापन करण्यात आले आहे. याबाबत मा. आयुक्त शिक्षण यांनी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची बैठक घेवून नवीन कर्मचाऱ्यांना शालार्थ क्रमांक देण्याचे अधिकार विभागस्तरावर | शासनस्तरावर/ संघटनास्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | देण्याबाबत शासनकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला असून निर्णय अद्याप प्रलंबित आहे.<br>संघटनेने नवीन कर्मचाऱ्यांचे सुध्दा ऑफलाईन वेतन काढण्याबाबत शासनास स्वतंत्र निवेदन सादर करावे. | | |
| ११ | वरिष्ठ वेतनश्रेणी/निवडश्रेणी मान्यता प्रस्ताव पूर्ववत लेखाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी देणेत यावेत. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व लेखाधिकारी यांची संयुक्त बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल.<br>संस्थाअंतर्गत वादामुळे किंवा अन्य कारणांमुळे पात्र असणाऱ्या वरिष्ठ वेतनश्रेणी/निवडश्रेणी शिक्षकांबाबत सुनावणी घेवून तात्काळ निर्णय घ्यावेत. तसेच शिक्षणाधिकारी यांनी वरिष्ठ/निवडश्रेणीस पात्र असणाऱ्या व प्रशिक्षण पूर्ण न केलेल्या शिक्षकांकडून लगतचे प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या अटीवर हमीपत्र घेवून, सुनावणी घेवून वरिष्ठ/निवडश्रेणीस मान्यता द्यावी.<br>दि. ०२ मे २०१८ पासून वरिष्ठ/निवडश्रेणी बाबतचे प्रशिक्षण राज्यमंडळाकडून घेण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणास ऑनलाईन नावे नोंदणी करावयाची आहेत. ऑनलाईन नावे नोंदणीसाठी शिक्षकांकडून मिळणाऱ्या अल्प प्रतिसादामुळे राज्यमंडळास प्रशिक्षण पुढे ढकलावे लागते त्यामुळे आपल्या संघटनेकडून जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षणासाठी राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नावे नोंदणी करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. | शिक्षण उपसंचालक/ शिक्षणाधिकारी/ लेखाधिकारी / संघटना स्तरावर | -- |
| १२ | जिल्हयातील संस्था अंतर्गत बदली बाबतचा शालार्थ आयडी असलेल्या शिक्षकांना मा. शिक्षणाधिकारी यांचे मान्यतेची गरज काय? वेतनपथक अधिक्षकांना कळवून पुढील कार्यवाही व्हावी. | शिक्षकांच्या बदल्या करताना एम.ई.पी.एस. ॲक्ट मधील तरतूदीनुसार विषयाची निकड पाहून सत्राच्या सुरुवातीस बदली करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी सर्व संस्थांना परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित काराव्यात. संस्थांनी शिक्षकांची शैक्षणिक सत्र संपण्याआधीच बदली करु नये. याबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांनी वस्तुस्थिती तपासून बदलीस मान्यता द्यावी. | शिक्षणाधिकारी/ संस्था स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | न्यायालयीन आदेशप्राप्त कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी खाते वर्गणी सुरु करणेबाबत/भविष्य निर्वाह निधी क्रमांक मिळणेबाबत. | सन २००५ पुर्वीच्या ज्या नियुक्त्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक देण्यात आलेले आहेत. | वेतन पथक स्तरावर | -- |
| १४ | सेवाज्येष्ठता यादी मधील (दि.१४ नोव्हें २०१७ चा शा.नि.) संदिग्धता दूर करणेबाबत. | दि.१४/११/२०१७ च्या शासन निर्णयाबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शासनाकडे शासन निर्णय दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. शासनाकडून शुध्दीपत्रक येणे अपेक्षित आहे. | शासन स्तरावर | -- |
| १५ | एकाकी पद (शिक्षक, शिपाई) पदे भरतीस मान्यता मिळणेबाबत. | सद्यस्थितीत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतीबंधाबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु असल्यामुळे शिक्षकेतर पदभरतीस बंदी आहे. | शासन स्तरावर | -- |
| १६ | प्रचलित नियमाप्रमाणे दर तिमाही शिक्षणाधिकारी स्तरावर सहविचार सभा घेतल्या जाव्यात. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी आपल्या जिल्हास्तरावर नियमितपणे संघटनांच्या त्रैमासिक सभांचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| १७ | रजा कालावधीत नियुक्त करावयाच्या पदांना जाहिरातीस मान्यता मिळणेबाबत. | रजा कालावधीत नियुक्त करावयाच्या पदांना जाहिरातीस मान्यतेची आवश्यकता नाही. | -- | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर